# टोरेंट पॉवर लिमिटेड

## जाहिर सूचना

**वीज कायदा, 2003 च्या कलम 14 आणि कलम 15 अन्वये पुणे जिल्हयाकरिता वितरण परवाना मंजूर करण्यासाठी टोरेंट पॉवर लिमिटेडने दाखल केलेल्या अर्जावर सूचना/हरकती मागवण्याची सूचना (प्रकरण क्र. 2023 चे 2)**

1. टोरेंट पॉवर लिमिटेडने **(टीपीएल)** वीज कायदा, 2003 (अधिनियम) च्या कलम 14 आणि 15 सह MERC (वितरण परवान्याच्या सामान्य अटी) विनियम, 2006 आणि इतर लागू नियमांतर्गत वितरण परवान्याच्या मंजुरीसाठी महाराष्ट्र विदयुत नियामक आयोग **(आयोग)** यांच्याकडे अर्ज (प्रकरण क्र. 2023 चे 2) दाखल केला आहे. आयोगाने 5 जानेवारी 2023 रोजी अर्ज स्वीकारला आहे आणि टीपीएल ला कायद्याच्या कलम 15 (2) अंतर्गत जाहिर सूचना प्रकाशित करण्याचे निर्देश दिले आहेत.

2. **अर्जाची वैशिष्ट्ये थोडक्यात खाली दिली आहेत:**

| | |
|---|---|
| अर्जदाराचे नाव | टोरेंट पॉवर लिमिटेड |
| अर्जदाराच्या नोंदणीकृत कार्यालयाचा पत्ता | ''समन्वय'', 600, तपोवन, अंबावाडी, अहमदाबाद, गुजरात–380015 |
| अर्ज केलेल्या परवान्याचे स्वरूप | वीज कायद्याच्या कलम 14 च्या 6 व्या तरतुदीनुसार वितरण परवाना |
| अर्जदाराचे व्यवसायाचे मुख्य ठिकाण | पुणे महानगरपालिका, पिंपरी चिंचवड महानगरपालिका आणि पुणे जिल्ह्यातील इतर क्षेत्र यांचा समावेश असलेले भौगालिक क्षेत्र |

3. **अर्जाची इतर ठळक वैशिष्ट्ये:**

- टीपीएल ही भारतातील आघाडीच्या वीज कंपन्यांपैकी एक आहे. वीज निर्मिती, पारेषण आणि वितरण या सर्व क्षेत्रांमध्ये टीपीएल ची सक्षम उपस्थिती आहे. सध्या टीपीएल वितरण परवानाधारक म्हणून गुजरातमधील अहमदाबाद, गांधीनगर, सुरत आणि दहेज येथील ग्राहकांच्या विदयुत मागणीची पूर्तता करत आहे. टीपीएल ही महाराष्ट्रातील भिवंडी आणि शीळ, मुंब्रा व कळवा **(एसएमके)** भागात आणि उत्तर प्रदेशमध्ये आग्रा येथे वितरण फ्रँचायझी आहे.
- टीपीएल ने आपल्या कार्यक्षेत्रात वीज वितरणात जागतिक दर्जाच्या पायाभूत सुविधा निर्माण केल्या आहेत, ज्यात विस्तृत भूमिगत नेटवर्क तयार करणे आणि त्याच्या कार्यपद्धतीतील उत्कृष्टतेसह, 99.9% पेक्षा जास्त उपलब्धता आणि 3.93% पर्यंत वितरण नुकसान कमी करण्यात यश मिळविले आहे.
- टीपीएल ने अलीकडेच दमण व दीव आणि दादरा व नगर हवेली या केंद्रशासित प्रदेशाचे वीज वितरणाचे काम हाती घेतले आहे. शिवाय, टीपीएल गुजरातमधील अहमदाबाद, गांधीनगर, सुरत आणि दहेज SEZ आणि महाराष्ट्रातील भिवंडी आणि एसएमके आणि उत्तर प्रदेशातील आग्रा येथील 40 लाखाहून अधिक वीजग्राहकांना सुमारे 17 अब्ज युनिट वीज पुरवठा करते. दमण व दीव आणि दादरा व नगर हवेलीमध्ये टीपीएलची सुमारे 10 अब्ज युनिट्सची विक्री होत आहे.
- प्रस्तावित परवाना क्षेत्राच्या ग्राहकांना जागतिक दर्जाची विश्वासार्हता आणि दर्जेदार वीजपुरवठा उपलब्ध करून देणे हे टीपीएल चे प्राथमिक उद्दीष्ट आहे. टीपीएल ची महाराष्ट्रातील विद्यमान उपस्थिती किरकोळ ग्राहकांसाठीही अधिक चांगली मूल्यवान सेवा उपलब्ध करून देण्यास सक्षम आहे.
- सध्या महाराष्ट्र राज्य विदयुत वितरण कंपनी लिमिटेड (महावितरण) प्रस्तावित परवाना क्षेत्रामध्ये सेवा देत आहे.

4. **अर्जदाराची कायदेशीर स्थिती आणि नोंदणी क्रमांक:**

पब्लिक लिमिटेड कंपनी (L31200GJ2004PLC044068)

5. **भागधारकांचा तपशील:**

| अ.क्र. | भागधारकाचे नाव | समभाग संख्या प्रत्येकी रू. 10/– |
|---|---|---|
| 1. | टोरेंट इन्व्हेस्टमेंट्स प्रायव्हेट लिमिटेड (पूर्वी टोरेंट प्रायव्हेट लिमिटेड या नावाने ओळखले जाणारे) | 257,422,311 |
| 2. | सुधीर मेहता | 6,882 |
| 3. | समीर मेहता | 6,125 |
| 4. | जीनल मेहता | 8,000 |
| 5. | गुजरात राज्य वित्तीय सेवा लि. | 46,871,621 |
| 6. | ॲक्सिस म्युच्युअल फंड ट्रस्टी लिमिटेड | 41,460,264 |
| 7. | अन्य भागधारक | 134,841,581 |
| | एकुण | 480,616,784 |

6. **व्यवस्थापन परिचय:**

| अ.क्र. | नाव | पदनाम | अनुभवाचे क्षेत्र | अनुभव (वर्षे) |
|---|---|---|---|---|
| 1. | ललित मलिक | मुख्य वित्तीय अधिकारी (CFO) | आर्थिक नियोजन आणि धोरण, USGAAP, IFRS आणि भारतीय GAAP अंतर्गत लेखा, कॉर्पोरेट पुनर्रचना, विलीनीकरण, अधिग्रहण, ट्रेझरी, कर नियोजन आणि अंमलबजावणी, बजेटिंग, कॉर्पोरेट गव्हर्नन्स, जोखीम व्यवस्थापन आणि अनुपालन या क्षेत्रातील अनुभव | 31 |
| 2. | चेतन बुंदेला | उपाध्यक्ष (VP) | निर्मिती, पारेषण आणि वितरणातील समृद्ध अनुभव. वीज खरेदी, दरनिश्चिती, अक्षय ऊर्जा, परवाना आणि नियमांमधील विविध उपक्रमांची संकल्पना आणि अंमलबजावणी करण्यात सक्रिय भूमिका. नियामक आणि कॉर्पोरेट अफेयर्सच्या क्षेत्रात विशेषज्ञता | 28 |
| 3. | कश्यप देसाई | उपाध्यक्ष (VP) | निर्मिती, पारेषण आणि वितरणाचा अनुभव. विकास, प्रचालन आणि देखभाल तसेच विद्युत वितरण नेटवर्कच्या प्रकल्प अंमलबजावणीत सहभाग | 39 |
| 4. | नैमेश शाह | उपाध्यक्ष (VP) | वित्त आणि वीज व्यवसायाच्या खात्यांमधील मुख्य कार्यात्मक अनुभव. प्रकल्प वित्त आणि लेखा हाताळणी मूलभूत आर्थिक नियोजन, प्रक्रिया आणि प्रणालींवर लक्ष केंद्रित करून व्यावसायिक बाबी हाताळण्याचा अनुभव | 36 |
| 5. | उमंग दत्त | उपाध्यक्ष (VP) | व्यावसायिक ऑपरेशन्स, मीटरिंग, वसुली आणि ग्राहक सेवांसह वीज वितरण ऑपरेशन्समधील विविध अनुभव. ग्राहक सेवा, कॉल सेंटर, ब्रँडिंग, मार्केटिंग, वीज वितरण, जनसंपर्क यातील दांडगा अनुभव | 22 |
| 6. | एल.एन. मिश्रा | उपाध्यक्ष (VP) | व्यवसाय विकास, प्रकल्प व्यवस्थापन आणि प्रचालन, वीज पारेषण आणि वितरणातील देखभाल यांचा अनुभव | 36 |
| 7. | राजीव सराफ | उपाध्यक्ष (VP) | युटीलिटी, पायाभूत सुविधा आणि दूरसंचार उद्योगांमधील वैविध्यपूर्ण अनुभव. निपुण आईटी आणि व्यवसाय सल्लागार | 33 |
| 8. | अभय वाईकर | उपाध्यक्ष (VP) | मानव संसाधन व्यवस्थापन आणि औद्योगिक संबंध, कामगार व्यवस्थापन, वेतन, पगार, प्रशिक्षण, नियुक्ती, कामगिरी मूल्यांकन उपक्रम या क्षेत्रातील समृद्ध अनुभव | 29 |

7. **कार्य सारांश आणि तत्सम कार्याचा मागील अनुभव:**

- टोरेंट समूहाने अनुक्रमे 1996 आणि 1998 मध्ये सुरत इलेक्ट्रिसिटी कंपनी (एसईसी) आणि अहमदाबाद इलेक्ट्रिसिटी कंपनी (एईसी) च्या कामकाजाचा ताबा घेतला आणि त्या अनुषंगाने या दोन युटिलिटीजच्या कार्यात कार्यक्षमता आणली.
- टीपीएल ने अहमदाबाद, गांधीनगर आणि सुरत परवाना क्षेत्रातील ग्राहकांना विश्वसनीय आणि दर्जेदार वीज पुरवठा सुनिश्चित केला आहे. टीपीएल ने त्यांच्या कार्यक्षेत्रात जागतिक दर्जाच्या वीज वितरण पायाभूत सुविधा निर्माण केल्या आहेत, ज्यात व्यापक भूमिगत नेटवर्कच्या निर्मितीचा समावेश आहे. टीपीएल ने ऑपरेशनल उत्कृष्टतेसह 99.9% पेक्षा जास्त उपलब्धता आणि 3.93% पर्यंत वितरण नुकसान कमी केले आहे, ज्याची जागतिक बेंचमार्कशी तुलना करता येते.
- टीपीएल ने अहमदाबाद, गांधीनगर आणि सुरत परवाना क्षेत्रातील वितरण तोटा कार्यक्षम मीटरिंग आणि बिलिंग पद्धतीद्वारे कमी केला आहे आणि वीजेची चोरी नियंत्रित केली आहे. भारत सरकारच्या उर्जा मंत्रालयाने देखील टीपीएल च्या ऑपरेशन्सची उत्कृष्टता ओळखली आहे.
- टीपीएल ने ग्राहक हितासाठी अनेक उपक्रम घेतले आहेत, ज्यामध्ये सक्रिय ग्राहक सेवांचा समावेश आहे, जसे व्यापक ग्राहक पोर्टल, मोबाईल ॲप, इ. सादर करणे.
- टीपीएल गुजरातमधील अहमदाबाद, गांधीनगर, सुरत आणि दहेज SEZ आणि महाराष्ट्रातील भिवंडी व एसएमके आणि उत्तर प्रदेशातील आग्रा येथे सुमारे 40 लाख ग्राहकांना सुमारे 17 अब्ज युनिट वीज पुरवते. तसेच दमण व दीव आणि दादरा व नगर हवेलीमध्ये, टीपीएल सुमारे 10 अब्ज युनिट वीज पुरवते.
- वितरण फ्रँचायझी म्हणून टीपीएल ने बिलिंग आणि संकलन कार्यक्षमतेत सुधारणा करून वितरण नेटवर्क सुधारणे, मीटरिंग प्रणाली सुधारणे आणि अत्याधुनिक ग्राहक कॉल सेंटर्सची स्थापना यासारख्या व्यावसायिक उपाययोजनांद्वारे, व्यावसायिक आणि वितरण तोटा कमी करण्यासाठी महत्त्वपूर्ण सुधारणा केल्या आहेत.

8. **पुरवठ्याचे प्रस्तावित क्षेत्र, त्याचे वर्णन आणि सेवा देण्याचा प्रस्ताव असलेल्या ग्राहकांची संख्या:**

- पुणे महानगरपालिका, पिंपरी चिंचवड महानगरपालिका आणि पुणे जिल्ह्यातील इतर क्षेत्र यांचा समावेश असलेल्या भौगालिक क्षेत्रात टीपीएल वितरण परवाना देण्याची मागणी करीत आहे.
- परवाना दिल्यापासून 5 वर्षांच्या अखेरीस टीपीएल 6 लाखाहून अधिक ग्राहकांना सेवा देईल.

9. **नोडल व्यक्तीचे संपर्क तपशील ज्यांच्याकडून अर्जाची प्रत तपासणी किंवा खरेदीसाठी मिळू शकते:**

| | | |
|---|---|---|
| I. | व्यक्तीचे नाव आणि पद | राघवेंद्र राव, महाव्यवस्थापक |
| II. | तपासणीसाठी किंवा खरेदीसाठी अर्जाची प्रत जिथून मिळवायची त्या कार्यालयाचा पत्ता: | ''टोरेंट पॉवर लिमिटेड'', आदेश्वर टॉवर, अे. विंग, कामतघर, नारपोली, मुंबई आग्रा रोड (जुना), भिवंडी, ठाणे जिल्हा, महाराष्ट्र 421302. |
| III. | अर्जाची तपशीलवार कागदपत्रे सीडीसह (इंग्रजीमध्ये) (रू. 150/– रोखीने किंवा डीडी/धनादेश काढल्यावर [टोरेंट पॉवर लिमिटेड] अहमदाबाद येथे देय). | |
| IV. | तपशीलवार अर्जाची कागदपत्रे (इंग्रजीमध्ये) (रु. 100/– च्या देय रकमेवर) | |
| V. | तपशीलवार अर्ज दस्तऐवजाची सीडी (इंग्रजीमध्ये) (रु. 50/– च्या देय रकमेवर) | |

10. **संकेतस्थळाचा पत्ता जिथून अर्जाची प्रत आणि त्यात नमुद केलेले इतर दस्तऐवज विनामूल्य डाउनलोड केले जाऊ शकतात:** https://www.torrentpower.com/index.php/site/info/businessAreas/application2

11. टीपीएल याद्वारे पुष्टी करते की ते केंद्र सरकारने अधिसूचित केलेल्या (भांडवल पर्याप्तता, पतयोग्यता आणि आचारसंहिता) नियम, 2005 (वेळोवेळी सुधारणा केलेल्या) च्या नियम 3 अंतर्गत निर्धारित केलेल्या निकषांची पूर्तता करते, जे भांडवल पर्याप्तता, पतयोग्यता आणि आचारसंहिते संदर्भात अतिरिक्त आवश्यकतांची तरतूद करते. टीपीएल ने वरील तपशीलवार परवाना अर्ज दाखल केला आहे आणि अर्जाचा भाग म्हणून सर्व अनुपालन दस्तऐवज देखील सोबत जोडले आहेत.

12. परवाना मंजूर करण्याच्या संदर्भात सूचना/हरकती करू इच्छिणारी कोणतीही व्यक्ती अशा सूचना/हरकती, इंग्रजी किंवा मराठीतुन लिखित स्वरूपात इलेक्ट्रॉनिक माध्यमातून ई–मेल: suggestions.torrentpune@merc.gov.in **सचिव, महाराष्ट्र विदयुत नियामक आयोग, जागतिक व्यापार केंद्र, केंद्र क्रमांक–1, 13 वा मजला, कफ परेड, कुलाबा, मुंबई – 400005** यांना सदरहू नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून तीस (30) दिवसांच्या आत, टीपीएल/अर्जदार (ई–मेल: applicationpunearea@torrentpower.com) यांना पाठविल्याच्या पुराव्यासह सादर करू शकते. ही सूचना प्रसिद्ध झाल्यापासून 30 व्या दिवशीच्या संध्याकाळी 5 वाजेनंतर आलेल्या सूचना आणि/किंवा हरकती विचारात घेतल्या जाणार नाहीत.

**टोरेंट पॉवर लिमिटेड,**
''समन्वय'', 600, तपोवन
अंबावाडी, अहमदाबाद–380015
CIN: L31200GJ2004PLC044068

स्थळ : अहमदाबाद
दि.: 7 जानेवारी, 2023

**टोरेंट पॉवर लिमिटेड, करिता**
सही/–
**उपाध्यक्ष (कॉर्पोरेट अफेअर्स)**